# वेगवेगळया ५ अल्पवयीन मुलींच्या अपहरण करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा तपास करुन छडा लावण्यात यश

पुणे शहरामध्ये विविध ठिकाणावरून अपह्रत केलेल्या अल्पवयीन मुलींचा दाखल गुन्ह्यांचा तांत्रिक रित्या कौशल्यपुर्ण व जलदगतीने तपास करुन परराज्यातुन तसेच पुणे जिल्हातुन अल्पवयीन मुलींचा शोध घेवून त्यांना व गुन्ह्यातील आरोपींना संबधित पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

हडपसर पोलीस स्टेशन गुरंनं १४६७/२०१८ मधील अल्पवयीन मुलगी हिला मांजरी, हडपसर भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. दाखल गुन्ह्याच्या तपासामध्ये इसम नामे महादेव आंधळे, रा. मांजरी, पुणे (मुळ गाव- वाशिम) यास माण, ता. मुळशी, पुणे येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे व हडपसर पोलीस स्टेशन गुरंनं ८५२/२०१८ मधील अल्पवयीन मुलगी हिला आकाशवानी समोर, हडपसर, पुणे भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. सदर अल्पवयीन मुलीला इसम नामे चेतन साईनाथ जाधव, वय २३ वर्षे रा. हडपसर यास शांतीनगर वसाहत, बनकर कॉलनी, हडपसर, पुणे येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे.

बिबवेवाडी पोलीस स्टेशन गुरनं २७१/२०१७ मधील अल्पवयीन मुलगी हिला बिबवेवाडी, पुणे भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. दाखल गुन्हाच्या तपासामध्ये इसम नामे शाहरूख शेख, रा. गंजपेठ, पुणे यास कोंढवा, येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे.

कोंढवा पोलीस स्टेशन गुरनं ८३/२०१९ मधील अल्पवयीन मुलगी हिला कोंढवा, पुणे भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. दाखल गुन्हाच्या तपासामध्ये इसम नामे साकीर सादीक शेख, रा. कोंढवा, पुणे यास विजापुर कर्नाटक, येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे.

दिघी पोलीस स्टेशन गुरनं १४६/२०१५ मधील अल्पवयीन मुलगी हिला दिघी, पुणे भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. दाखल गुन्हाच्या तपासामध्ये इसम नामे सोमनाथ गुलाब कुंभार, रा. आळंदी, पुणे यास पिंपरी, पुणे येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे.

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुरनं १४३/२०१८ मधील अल्पवयीन मुलगी हिला जनवाडी, पुणे भागातुन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेहले होते. दाखल गुन्हाच्या तपासामध्ये इसम नामे अनिकेत बबनराव गायकवाड, रा. दौंड, पुणे यास तव (लवासा) ता. मुळशी, पुणे येथून ताब्यात घेवून अपह्रत केलेल्या मुलीची सुटका करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही श्री. भानुप्रताप बर्गे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २ यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. मनिषा झेंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सामजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर व स्टाफने वेगवेगळ्या अपहरण केलेल्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात यश प्राप्त केलेले आहे.